25-02-2025-Dai-03FF_DH_PAN_20_08_2016-3.qxp 02/24/2025 11:31 PM Page 1



## निवडक

### पीर्णच्या केळंबिका देवस्थानाचा आज वर्धापनदिन सोहळा



■ टीम दैनिक हेराल्ड

**म्हापसा, दि. २४ :** वयले भाटले – पीर्ण (बार्देश) येथील श्री देवी केळंबिका, सत्पुरुष, महादेव पंचायतनाच्या प्रतिष्ठापनेचा सहावा वर्धापनदिन सोहळा मंगळवार दि. २५ रोजी साजरा करण्यात येणार आहे. त्यानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी श्रीस अभिषेक व नंतर आरती, तीर्थप्रसाद, सामुदायिक गाऱ्हाणे व महाप्रसाद होणार असून रात्री ९.३० वाजता पावणी व त्यानंतर नाईकवाडा – पीर्ण प्रस्तुत व बाबा प्रसाद लिखित 'मेलो उल्लो एकूच' या दोन अंकी कोकणी विनोदी नाटकाचा प्रयोग सादर करण्यात येईल. भाविकांनी सहकुटुंब व मित्रमंडळीसह उपस्थित राहून उत्सवाचा लाभ घ्यावा, असे आवाहन श्री देवी केळंबिका संस्थान समितीने केले आहे.

---

### वळवई येथील महादेव देवस्थानात उद्या महाशिवरात्री

■ टीम दैनिक हेराल्ड

**सावईवेरे, दि. २४ :** महादेवभाट – वळवई येथील श्री महादेव देवस्थानात बुधवार दि. २६ रोजी महाशिवरात्री सोहळा होणार आहे.
यानिमित्त सकाळी विधीवत पूजाअर्चा, सकाळी ८ वाजल्यापासून श्रींस अभिषेक, दुपारी १ वाजता आरती, तिर्थप्रसाद, संध्याकाळी ७ वाजता स्थानिक कलाकारांचा भजनाचा कार्यक्रम होणार आहे. तरी सर्व भाविकांनी व महाजनांनी कार्यक्रमास उपस्थित राहून तीर्थप्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन देवस्थान समितीतर्फे करण्यात आले आहे.

---

### बोर्डे येथील बाळूमामा मंदिरात २७ रोजी अमावस्या



टीम दैनिक हेराल्ड

**डिचोली, दि. २४ :** लाखेरे बोर्डे येथे श्रीसंत बाळुमामा मंदिरात अमावस्या गुरुवार दि. २७ रोजी साजरी करण्यात येणार आहे. संध्याकाळी ठीक ७:३० वाजता मामांची आरती, तीर्थ प्रसाद व आंबील प्रसाद. पूजेचे मानकरी चंद्रकांत शाहू ताटे. करण गणपत परब पिळगाव डिचोली गोवा तर्फे महाप्रसाद. व रात्री ८ वाजता श्री विघ्नेश्वर सातेरी घुमट आरती मंडळ वन गोवा यांचा आरतीचा कार्यक्रम होईल. शुक्रवार दि. २८ रोजी पहाटे ५ वाजता काकड आरती. सर्व भक्तमाऊलींनी लाभ घ्यावा, असे आवाहन लाखेरे ग्रामस्त मंडळ बोर्डे डिचोली गोवा यांनी केले आहे.

---



**नार्वे : रथाच्या पूजन प्रसंगी श्रीवल्लभ सरदेसाई, विजय सरदेसाई, शिरिस सरदेसाई, मंदार सरदेसाई, संजय सरदेसाई, अजय सरदेसाई व मिलिंद सरदेसाई.**

### नार्वे येथील सप्तकोटेश्वर रथाला चढला नवा साज

■ टीम दैनिक हेराल्ड

**डिचोली, दि. २४ :** छत्रपती शिवाजी महाराजांनी पुन:प्रतिष्ठापना केलेल्या नार्वे डिचोली येथील ऐतिहासिक श्री सप्तकोटेश्वर मंदिराच्या सुमारे शंभर वर्षांपूर्वीच्या रथाला नवा साज चढविण्यात आला आहे.या रथाला त्याचे पुन:वैभव प्राप्त करून देताना देवस्थान व्यवस्थापन समिती तर्फे रथाला नवा साज चढवीत विधिवत पूजन करण्यात आले. अध्यक्ष शिरीष जे.सरदेसाई यांच्या उपस्थितीत सचिव मंदार सरदेसाई यांनी रथाचे पूजन केले.या वेळी समिती सदस्य श्रीवल्लभ सरदेसाई,विजय सरदेसाई,संजय सरदेसाई,अजय सरदेसाई,मिलिंद सरदेसाई आदिंची उपस्थिती होती.

---

### वारंवार वीजेच्या लपंडावामुळे आगोंद, खोला भागातील नागरिक हैराण

■ टीम दैनिक हेराल्ड

**आगोंद, दि. २४ :** आगोंद व खोला भागात सततच्या वीज लपंडावामुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. आज दि. २४ रोजी वीजपुरवठा किमान ७० वेळा खंडीत झाला. गेल्या काही दिवसात, असे सतत घडत असून यासंबंधीची चीढ नागरिक व्यक्त करत आहे. यासंबंधी अधीक जाणून घेण्यासाठी प्रयत्न केला असता वीज अभियंता गोविंद भट म्हणाले की, आमडे येथील वीज ट्रान्सफर संदर्भातील काही तांत्रिक बिघाडामुळे वीज सुरळीत होण्यास अडचण येत असले तर लवकरच यावर तोडगा निघेल. वारंवार वीज खंडित झाल्यामुळे घरांतील किमती वीजेवरील उपकरणे खराब होत आहेत. शिवाय विद्यार्थी वर्गाला याचा खूप त्रास होत असतो. स्वयंपाक घरातील महिला वर्ग नाराजी व्यक्त करतात. बैंक व अन्य सरकारी आस्थापनांच्या कामात अडथळा निर्माण होत असतो परिणामी वेळेचा अपव्यय होतो. पावसाळ्यात वीज पुरवठा खंडीत होणे समज शकतो मात्र वारा, न वादळ परत परत वीज गायब हा काय प्रकार? अशा सर्रास प्रतिक्रिया या भागातून व्यक्त होत आहेत.

# डबल ट्रॅकिंग बाबत रेल्वे आणि रहिवाशांमध्ये वादळी बैठक

**रेल्वेने टाकलेला अनधिकृत भराव तातडीने हटवण्याची ग्रामस्थांनी केली मागणी : येत्या १५ दिवसात रस्त्याचा नवा आराखडा सादर करण्याचे आरव्हीएनएलचे आश्वासन**

■ टीम दैनिक हेराल्ड



**वेळसाव, दि. २४ :** रेल्वे विस्तारीकरणाच्या कामामुळे रस्ते बंद झाल्याच्या वाढत्या तक्रारींमुळे सोमवारी वेळसाव –पाले–आरोशी पंचायत कार्यालयात ग्रामस्थ आणि रेल विकास निगम लिमिटेड (आरव्हीएनएल) अधिकाऱ्यांमध्ये तणावपूर्ण बैठक पार पडली. डबल–ट्रॅकिंग प्रकल्पाच्या विरोधानंतर प्रथमच आरव्हीएनएल अधिकाऱ्यांनी ग्रामपंचायतीच्या बैठकीत सहभागी होऊन स्थानिक रहिवाशांसोबत संवाद साधला. ग्रामस्थांनी आपल्या अडचणी मांडल्यानंतर, आरव्हीएनएलने पुढील १५ दिवसांत पर्यायी रस्त्यासाठी सुधारित आराखडा सादर करण्याचे आश्वासन दिले.

पंचायतीने आरव्हीएनएलला रहिवाशांच्या घरांसमोर टाकलेला मातीचा भराव तातडीने हटवण्याचे आदेश दिले. तसेच, रेल्वे ट्रॅकच्या समोरील पारंपारिक प्रवेश मार्ग अडथळ्यांमुळे बाधित झाल्याने तो मोकळा करण्यास सांगितले.

या बैठकीत प्रभावित नागरिक तीन गटांमध्ये विभागले गेले होते. प्राइमवाडा आणि पाले येथील रहिवासी, जे समुद्राकडे तोंड करून लेव्हल क्रॉसिंग २६ च्या उजवीकडे राहतात. प्राइमवाडा येथील रहिवासी, जे लेव्हल क्रॉसिंग २६ च्या डावीकडे आहेत. आणि आरोशी येथील रहिवासी जे रेल्वे विस्तारीकरणामुळे सर्वाधिक प्रभावित झाले आहेत.

सरपंच डायना गौवेया यांनी स्पष्ट केले की, आतापर्यंत आरव्हीएनएलने आम्हाला अधिकृत आराखडा दिला नाही, त्यामुळे ग्रामस्थांशी चर्चा करता आलेली नाही. मात्र, आरव्हीएनएलने आता १५ ते २० दिवसांत सुधारित आराखडा देण्याचे कबूल केले आहे. तो मिळाल्यानंतर आम्ही ग्रामस्थांकडून अभिप्राय घेऊ.

घरांच्या प्रवेशद्वाराजवळ पडलेले मातीचे ढीग त्वरित हटवावेत, मागील रस्ता उद्ध्वस्त झाल्याने नवीन ड्रेनेज प्रणाली विकसित करावी, पर्यायी रस्ता उपलब्ध होईपर्यंत सर्व बांधकामे तातडीने थांबवावीत, जमिनीच्या कायदेशीर मालकीसंबंधी आरव्हीएनएलने कागदपत्रे सादर करावीत अशा प्रमुख मागण्या रहिवाशांनी यावेळी या बैठकीत केल्या. ग्राम विकास समितीचे उपाध्यक्ष मॅक्स डिसोझा म्हणाले, रेल्वे अभियांत्रिकी संहितेनुसार, स्थानिक स्वराज्य संस्थेशी चर्चा करणे बंधनकारक आहे. मात्र, आरव्हीएनएलने हा नियम पाळलेला नाही. आम्ही २०२० पासूनचे कायदेशीर दस्तऐवज सादर केले आहेत, जे स्पष्टपणे दर्शवतात की रेल्वे लाईनपर्यंतची जमीन रहिवाशांची आहे.

या वादात आणखी गुंतागुंत निर्माण झाली आहे, कारण मडगाव येथील जमीन आणि सर्वेक्षण न्यायालयात हा मुद्दा प्रलंबित आहे. रहिवाशांनी आरव्हीएनएलवर जमिनीच्या मालकीबाबत स्पष्टता न देण्याचा आरोप केला आहे.

या बैठकीबात बोलताना गोयचो एकवोट संस्थेचे संस्थापक ऑरव्हिल रॉड्रिग्ज म्हणाले, गावकरी आता रेल्वे अधिकाऱ्यांचे कोणतेही स्पष्टीकरण ऐकण्यास तयार नाहीत. आम्ही स्पष्ट संदेश देतो – आमची जमीन ताबडतोब रिकामी करा ! आरव्हीएनएल अधिकाऱ्यांनी आश्वासन दिले असले, तरी ग्रामस्थ साशंक आहेत. जर त्वरित कारवाई झाली नाही, तर मोठ्या प्रमाणात आंदोलन छेडण्याचा इशारा त्यांनी दिला आहे.

### वेळसाववासीयांवर विस्थापनाचे संकट?

**वेळसावच्या प्राइमवाडा भागात अनेक कुटुंबे पिढ्यानपिढ्यापासूनच्या त्यांच्या शेकडो वर्षांपासूनच्या वारसा घरात राहत आहेत. मात्र, सध्या त्यांचे अस्तित्व धोक्यात आले आहे. डबल ट्रॅकिंगच्या कामामुळे या घरांसमोर ट्रकभर माती टाकली गेली असून, कंपाऊंडच्या भिंतींना तडे गेले आहेत. त्यामुळे रहिवाशांचा मुख्य प्रवेश मार्ग पूर्णपणे बंद झाला आहे, परिणामी, ते अडकून पडले आहेत. या परिस्थितीमुळे विशेषतः ज्येष्ठ नागरिक आणि लहान मुलांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. रेल्वे ट्रॅकवरील गाड्यांच्या सततच्या कंपनांमुळे येथील नाजूक घरे हादरत आहेत. शिवाय, कोळसा आणि बांधकामाच्या धुळीमुळे परिसरातील हवा प्रदूषित झाली आहे. त्यामुळे आरोग्यावर गंभीर परिणाम होत असून, रहिवाशांना स्वतःच्या हक्काच्या जागेत राहण्याची भीती वाटू लागली आहे. ग्रामस्थांचे म्हणणे आहे की, त्यांच्या वैध मालकीच्या कागदपत्रांकडे दुर्लक्ष करून, रेल्वे अधिकाऱ्यांनी एकतर्फी कारवाई केली आहे. यामुळे अनेक कुटुंबांना घरातून बेघर होण्याची भीती वाटत आहे. वेळसावमध्ये नेमकी काय परिस्थिती आहे हे जाणून घेण्यासाठी खालील क्यूआर कोड स्कॅन करा.**

# रस्ता पूर्ण न झाल्यास आंदोलनाचा इशारा

■ टीम दैनिक हेराल्ड



**फोंडा, दि. २३ :** साकोर्डा येथील नावे ते खरवत हा रस्ता गेल्या दोन दशकांपासून अपूर्ण असून, या मार्गाच्या दुरुस्तीची मागणी करत स्थानिकांनी मार्चपर्यंत रस्ता पूर्ण न झाल्यास आंदोलन छेडण्याचा इशारा दिला आहे. स्थानिक पंच सदस्य महादेव शेटकर आणि ग्रामस्थांनी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे रस्त्याच्या दुरुस्तीबाबत वारंवार मागणी केली आहे. अपूर्ण रस्त्यामुळे नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत असून, शेतकरी आणि रोजच्या प्रवाशांसाठी हा प्रश्न अधिक गंभीर झाला आहे.

स्थानिकांच्या माहितीनुसार, वीस वर्षांपूर्वी या मार्गावर रस्त्याची कोणतीही व्यवस्था नव्हती. प्रारंभी येथे केवळ पाऊलवाट होती, त्यानंतर काही प्रमाणात खोदकाम करून दगड टाकण्यात आले. मात्र, हा भाग डोंगराळ असल्याने रस्त्याचा काही भाग अत्यंत खडबडीत आणि धोकादायक अवस्थेत आहे. या परिसरात सुमारे ८० घरे असून, या रस्त्याशिवाय पर्यायी मार्ग उपलब्ध नाही. विशेषतः गणेशोत्सवाच्या काळात स्थानिक नागरिकांना रगडा नदीकाठी गणेश मूर्ती विसर्जनासाठी जाताना अत्यंत अवघड मार्गाने प्रवास करावा लागतो. डोंगराच्या उतारावरून चालणे धोकादायक ठरत असल्याने ग्रामस्थांनी या समस्येकडे गांभीर्याने लक्ष देण्याची मागणी केली आहे.

गेल्या वर्षी काही जागरूक नागरिकांनी हा प्रश्न स्थानिक आमदार गणेश गावकर यांच्या निदर्शनास आणून दिला होता. त्यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाला रस्ता त्वरित पूर्ण करण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार निविदा प्रक्रिया राबवण्यात आली आणि पायाभरणी समारंभही पार पडला. मात्र, प्रत्यक्षात वर्षभरानंतरही कोणतीही ठोस प्रगती झालेली नाही. गेल्या आठवड्यात पंच सदस्य महादेव शेटकर यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अभियंत्यांसोबत रस्त्याची पाहणी केली. यावेळी अधिकाऱ्यांनी मार्चपर्यंत काम पूर्ण करण्याचे आश्वासन दिले. मात्र, ग्रामस्थांनी स्पष्ट शब्दांत सांगितले आहे की, जर ठरलेल्या वेळेत रस्ता पूर्ण झाला नाही, तर ते तीव्र आंदोलन छेडतील.

# बाणावलीत स्वबळावर निवडणुका लढवण्याची काँग्रेसची तयारी

टीम दैनिक हेराल्ड

बाणावली, दि. २४ : आगामी विधानसभा निवडणुकीत स्वबळावर लढण्याच्या दिशेने काँग्रेसने आपली मोर्चेबांधणी सुरू केली असून,बाणावली मतदारसंघात पक्षसंघटन बळकट करण्यावर भर दिला जात आहे. दक्षिण गोव्याचे काँग्रेस खासदार कॅप्टन विरियेतो फर्नांडिस यांनी बाणावली येथे पक्ष कार्यकर्त्यांशी संवाद साधला. मात्र, युतीसंदर्भात कोणतीही ठोस भूमिका घेण्याचे त्यांनी टाळले आणि हा निर्णय पक्षाच्या वरिष्ठ नेतृत्वावर अवलंबून असल्याचे स्पष्ट केले.

बाणावली हा आम आदमी पक्षाचा (आप) बालेकिल्ला मानला जात असल्याने काँग्रेसच्या या बैठकीकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष होते. स्थानिक कार्यकर्त्यांनी युतीविरुद्ध ठाम भूमिका मांडण्याची अपेक्षा व्यक्त केली होती. मात्र, फर्नांडिस यांनी युतीसंदर्भातील चर्चा योग्य वेळी, राज्य आणि राष्ट्रीय स्तरावरील पक्ष नेतृत्वाच्या मार्गदर्शनाखालीच होईल, असे सांगितले.

दक्षिण गोवा जिल्हा काँग्रेस समितीचे अध्यक्ष सॅव्हियो डिसिल्वा यांनी कार्यकर्त्यांना पक्षसंघटन मजबूत करण्याचे आवाहन केले. त्यांनी विश्वास व्यक्त केला की २०२७ मध्ये काँग्रेसचा उमेदवार बाणावलीमधून निवडून येईल. गोवा काँग्रेस डेस्कच्या सचिव डॉ. अंजली निंबाळकर यांनी स्पष्टपणे सांगितले आहे की राज्यात कोणतीही युती होणार नाही. त्यामुळे बाणावली मतदारांना काँग्रेसच्या उमेदवाराला निवडून देण्याची संधी मिळेल, असे डिसील्वा यांनी ठामपणे सांगितले.

माध्यमांशी बोलताना खासदार फर्नांडिस यांनी सध्या युतीवर चर्चा करणे हे अकाली असल्याचे नमूद केले. त्यांनी हे ही कबूल केले की गेल्या २५ वर्षांत काँग्रेसला बाणावलीमध्ये आमदारकी मिळवता आलेली नाही. याशिवाय, पक्षाच्या पराभवाला मतांची विभागणी कारणीभूत असल्याचेही त्यांनी सांगितले.

फर्नांडिस यांनी मतदारसंघातील काँग्रेस कार्यकर्त्यांसोबत संवाद साधण्याची मालिका हाती घेतली आहे. याचा उद्देश तळागाळातील पाठिंबा मजबूत करणे आणि जनतेचा विश्वास पुनर्स्थापित करणे आहे. विशेष म्हणजे, आप'सोबत कोणतीही युती न करण्याच्या स्थानिक काँग्रेस कार्यकर्त्यांच्या मागणीच्या पार्श्वभूमीवरच त्यांचा हा दौरा आयोजित करण्यात आला होता.

इतर विषयांवर भाष्य करताना, फर्नांडिस यांनी सरकारी अधिकाऱ्यांना राजकीय दबावाखाली येऊन गोव्याच्या हिताविरुद्ध काम न करण्याचा इशारा दिला. त्यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, गोव्याच्या जमिनी, संस्कृती, भाषा आणि ओळखीवर कोणताही आघात सहन केला जाणार नाही. तसेच, या मुद्द्यांवर लवकरच ठोस पावले उचलली जातील, असेही त्यांनी सूचित केले.

# केळशी ग्रामसभेचा महामार्ग विस्तारास विरोध

टीम दैनिक हेराल्ड

मडगाव, दि. २४ : रविवारी पार पडलेल्या सामान्य ग्रामसभेत केळशी ग्रामपंचायतीने वेळसाव ते केळशी महामार्ग विस्ताराला तीव्र विरोध दर्शवला. ग्रामस्थांनी या प्रकल्पामुळे स्थानिक रहिवाशांवर होणाऱ्या संभाव्य परिणामांविषयी चिंता व्यक्त केली. तसेच, पर्यावरणीय संतुलन आणि मूलभूत सुविधांच्या अपुऱ्या व्यवस्थापनासंदर्भातही चर्चा करण्यात आली.

ग्रामसभा सदस्य नातिविदाद फर्नांडिस यांनी महामार्ग विस्ताराच्या संभाव्य दुष्परिणामांवर प्रकाश टाकत सांगितले की, या प्रकल्पामुळे अनेक घरे बाधित होण्याची शक्यता आहे. यावर प्रतिक्रिया देताना सरपंच डिक्सन वाझ यांनी स्पष्ट केले की, पंचायतीला अद्याप कोणतीही अधिकृत अधिसूचना प्राप्त झालेली नाही. मात्र, या प्रकल्पामुळे स्थानिकांना धोका निर्माण झाल्यास पंचायत त्यास कडाडून विरोध करेल, असे त्यांनी ठामपणे सांगितले.

ग्रामसभेत पर्यावरणाच्या ऱ्हासाबाबतही चिंता व्यक्त करण्यात आली. सदस्य जोस डी'कोस्टा यांनी बेतुलजवळ समुद्रात अडकलेल्या एका तरंगत्या जहाजाकडे लक्ष वेधले, जे सागरी परिसंस्थेस हानी पोहोचवू शकते. यावर पंचायत तातडीने संबंधित अधिकाऱ्यांना पत्र लिहून आवश्यक ती कारवाई करण्याची विनंती करणार असल्याचे सरपंच वाझ यांनी जाहीर केले.

ग्रामस्थांनी गावातील भटक्या कुत्र्यांच्या वाढत्या संख्येबाबतही चिंता व्यक्त केली. कुत्र्यांच्या चाव्यांच्या घटनांमध्ये झालेली वाढ लक्षात घेऊन पंचायत प्राणी कल्याण अधिकाऱ्यांकडे निर्जंतुकीकरण शिबिर आयोजित करण्याची मागणी करणार असल्याचे वाझ यांनी सांगितले.

साळ नदीतील प्रदूषण हा आणखी एक महत्त्वाचा मुद्दा ग्रामसभेत उपस्थित करण्यात आला. नदीतील प्लास्टिक आणि इतर कचऱ्याच्या वाढत्या प्रमाणामुळे स्थानिक मच्छीमारांच्या उपजीविकेवर विपरीत परिणाम होत असल्याचे ग्रामस्थांनी निदर्शनास आणले. तसेच, हे प्रदूषण पर्यटनावरही प्रतिकूल परिणाम करू शकते, असा इशारा वाझ यांनी दिला. ग्रामसभेने गावातील पारंपारिक बंधाऱ्यांचे नूतनीकरण व कमी पाण्याच्या दाबाच्या समस्येचे निराकरण करण्यासाठी ठराव संमत केला. ग्रामस्थांना त्यांच्या मालमत्तेचे संरक्षण करण्याचे आवाहन करत सरपंच वाझ यांनी स्थानिक नागरिकांनी गोव्यातील घरे व जमिनी बाहेरच्या लोकांना विकू नयेत, असे सुचवले. यामुळे राज्याची सांस्कृतिक आणि पारंपरिक ओळख टिकवून ठेवण्यास मदत होईल, असे त्यांनी नमूद केले. याशिवाय, २०२५–२६ या आर्थिक वर्षासाठी ग्रामपंचायतीच्या वार्षिक अर्थसंकल्पास मंजुरी देण्यात आली. या बजेटमध्ये विविध विकास प्रकल्प आणि सामुदायिक सेवांसाठी अतिरिक्त निधीची तरतूद करण्यात आली आहे.

# साळेरी मुख्य रस्त्यावरील पुलाला गेले तडे

**कधीही दुर्घटना होण्याची शक्यता : तातडीने दुरुस्ती करण्याची ग्रामस्थांकडून मागणी**

■ टीम दैनिक हेराल्ड



**आगोंद, दि. २४ :** काणकोण उपजिल्हाधिकारी कार्यालयाचे अभियंता आणि सल्लागार पथकासह साळेरी– खोला पुलाची पाहणी करण्यात आली.

काणकोणचे उपजिल्हाधिकारी आणि काणकोणचे मामलेदार यांच्याशी यानिमित्ताने निवेदन देऊन संपर्क साधण्यात आला होता. या मागणीवर त्वरित दखल घेऊन टीम सदर ठिकाणी पोहोचली, असे प्रशांत खोलकर यांनी सांगितले.

आगोंद आणि खोला या दोन्ही गावांना जोडणारा हा पूल मच्छीमारांसाठीही धोकादायक बनला आहे. साळेरी या ठिकाणी मुख्य रस्त्यावरील पुलाला तडे गेले असून याठिकाणी कधीही मोठी दुर्घटना घडण्याची भिती ग्रामस्थांनी व्यक्त केलेली असून प्रशासनाने तातडीने उपाय योजना करण्याची मागणी निवेदनाद्वारे केली होती, असे साळेरी येथील जयराम पागी व अन्य ग्रामस्थांनी केलेली आहे.

माजी मुख्यमंत्री स्व.शशिकला काकोडकर यांच्याहस्ते १९७५ साली, या पुलाचे उद्घाटन करण्यात आले होते. त्यानंतर साधारणपणे १५ वर्षापूर्वी या पुलाची दुरुस्ती करण्यात आली होती. असे स्थानिक समाजकार्यकर्ते सुनील पागी या संबंधी बोलताना म्हणाले. यावेळी विशू खोलकर, भूषण खोलकर आदी उपस्थित होते.

या पुलावरून सतत वाहनांची वर्दळ चालू असते. काणकोण ते मडगाव महामार्गावर काही अपघात किंवा अन्य कारणांमुळे वाहतूक बंद झाल्यावर याच मार्गाने वाहतूक वळविली जाते. मोठी मालवाहू वाहने् या पुलावरूनच ये जा करत असतात. सध्या या पुलाला मोठे तडे गेलेले स्पष्ट दिसत असून या पुलाची तातडीने दुरुस्ती आवश्यक बनली आहे, असे जयराम पागी यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे. अनुचित घटना घडण्यापूर्वीच या पुलाच्या सध्यस्थितीचे तज्ञांकडून निरिक्षण करून त्यावर उपाय योजना करणे् आवश्यक आहे. त्यादृष्टीने रस्ते विभागाच्या अभियंत्याने निरिक्षण आज रोजी केले आहे.

# पणजी मार्केट परिसरात पाणीपुरवठा विस्कळीत

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. २४ :** स्मार्ट सिटी प्रकल्पाच्या कामांमुळे पणजी मार्केट परिसरातील रस्ते खोदणाऱ्या उत्खनन यंत्रांमुळे अनेक उंच इमारतींना जोडणाऱ्या पाण्याच्या पाईपलाईनचे नुकसान झाले आहे. परिणामी, रहिवाशांना गेल्या अनेक दिवसांपासून वारंवार पाण्याच्या तुटवड्याचा सामना करावा लागत आहे.

गेल्या आठवड्याच्या मध्यात जनरल बर्नार्ड ग्वेड्स रोडवरील पाईप लाईन लिकेज झाली. एका जेसीबीने सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मुख्य पुरवठा लाईनला 'सीगल' इमारतीच्या समप्सशी जोडणारी पाईपलाईन फोडली. या घटनेमुळे या इमारतीसह अन्य अनेक इमारतींमध्ये पाणीपुरवठा ठप्प झाला. पीडब्ल्यूडीने दुरुस्ती करताना संपूर्ण पुरवठा थांबवावा लागल्याने रहिवाशांना मोठ्या समस्येला सामोरे जावे लागले. रहिवाशांनी पाणीपुरवठा बंद असल्याने होणाऱ्या अडचणींबाबत नाराजी व्यक्त केली. स्मार्ट सिटीच्या कामामुळे पाणी टँकर पुरवठाही शक्य नसल्याचे पीडब्ल्यूडी अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले. त्यामुळे नागरिकांना कोणताही पर्यायी पर्याय उपलब्ध न राहिल्याने त्रास सहन करावा लागला.

शनिवारी पुन्हा अशीच घटना घडली. मार्केट परिसरातील मुख्य पुरवठा लाईनला एका निवासी इमारतीशी जोडणारी दुसरी पाईपलाईन उत्खनन यंत्राने फुटली. यामुळे आधीच पाण्याच्या संकटाला तोंड देणाऱ्या रहिवाशांचा त्रास अधिक वाढला.

स्मार्ट सिटी प्रकल्पाच्या कंत्राटदारांद्वारे सुरू असलेल्या कामामुळे संपूर्ण जनरल बर्नार्ड ग्वेड्स रोडवरील वाहतूक व्यवस्थाही कोलमडली आहे. या रस्त्यावरील गीता बेकरी जंक्शनपासून आयनॉक्स आणि डीबी मार्गापर्यंतचा भाग बाधित झाला आहे. ९ फेब्रुवारीपासून अनेक छेदनबिंदू आणि उपमार्ग वाहतुकीसाठी बंद करण्यात आले आहेत. इमॅजिन पणजी स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट लिमिटेड ने जाहीर केले आहे की १.४१५ किलोमीटर लांबीचे हे रस्ते २८ फेब्रुवारीपर्यंत सर्व वाहतुकीसाठी बंद राहतील. यामध्ये जनरल बर्नार्ड ग्वेड्स रोड (५३५ मीटर), कोस्टा अल्वारेस रोड (२०० मीटर)– अल्फ्रान प्लाझा ते डीबी रोड जंक्शन, डीबी मार्गाशी जोडणारा अंतर्गत मार्ग (२०० मीटर) – २ एटीसी मुख्यालयामागून कोस्टा अल्वारेस रोडला लागून असलेले आणखी दोन अंतर्गत मार्ग हे रस्ते बंद राहणार आहेत. रस्ते खोदण्याचे आणि पाईपलाईनचे नुकसान टाळण्यासाठी आवश्यक खबरदारी घेतली जात नसल्याची तक्रार स्थानिकांनी केली आहे. रहिवाशांना पुरेशी पूर्वसूचना न देता खोदकाम सुरू केल्यामुळे त्यांना अनेक समस्यांन सामोरे जावे लागत आहे. प्रशासनाने स्मार्ट सिटी प्रकल्पाच्या अंमलबजावणीस अधिक नियोजनबद्ध पद्धतीने गती देण्याची मागणी स्थानिकांकडून होत आहे.

**भावपूर्ण श्रद्धांजली : बारावा दिवस**

**कै. दत्ताराम (दाय) सुर्या रावळ**

मालार, दिवाडी, तिसवाडी–गोवा

तुमचं असणं आमच्यासाठी सर्वकाही होतं,
ते आमच्या आयुष्यातील एक सुंदर पर्व होतं
आज सर्व काही असण्याची जाणीव आहे,
पण आज तुम्ही नसणं ही सर्वांत मोठी उणीव आहे

तुमच्या आत्म्यास चिरशांती लाभो,
हीच ईश्वरचरणी प्रार्थना.



जन्म : १४–०४–१९७२
मृत्यू : १४–०२–२०२५

तुझेच,
**समस्त रावळ कुटुंबिय**